कुंजविहारी । राधावल्लभ कृष्ण मुरारी । जानकिजीवन दशवदनारी । गौरीशंकर तूं मदनारी । कमला नायक तूं असुरारी । अखिल विश्व हा तुझा पसारा । कालासी तव भीम दरारा । त्रिगुण षड्‌रिपु सर्व विकार । कायिक मायिक त्वदीय पाइक । जन्म मृत्यु जगिं दिसती ताजे । त्यावरि सत्ता तुझीच गाजे । चंद्रार्कानल नित्य प्रकाशति । त्वदीय तेजें । सिद्धचि मुळचा परमात्मा तूं । मूर्तामूर्त व्यक्ताव्यक्त । दृश्या दृश्य सर्वेहि व्यापक । असुनि अभेद । तव चरणाच्या रजः कणाची । सरी न आम्हां ऐसी ख्याती । वानिति गाती ज्या संताची, मोदें वंदवा ॥

### ५२ लावणी

( झाउ नकोरे विषयारविंची० या चालीवर )

पाटिल निष्ठावंत शिरडिचे रामचंद्र[1] नामा । घोर व्याधिनें खिळिले शय्ये मिळे न आरामा ॥ धृ ॥

एक दिनीं त्या जीव नको परि मरण बरें वाटे । त्याच निशीं श्री साइ मूर्ती सन्निध त्या प्रकटे ॥ १ ॥

पाय धरुनि तो विनवि भक्तवर “एक असे विनती” ॥
कथि सत्वर गुरु माय दयाळे “मदिया मरण मिती[2]” ॥ २ ॥
चाल:—तव हुंडि परतली व्यर्थ न चिंता करी । कि चिंता करी ॥
परि जाईल[3] तात्या[4] दसऱ्यादिनीं दो संवत्सरीं । कि संवत्सरीं ॥
कथि अप्रिय गोष्ट ना तया ठेवि अंतरीं । कि ठेवि अंतरीं ॥
चाल:—उठले पाटिल[5], पडले[6] तात्या मात घडली वामा[7] ।
तद्दिनिं[8] तात्या उठले[9] गेले[10] । बाबा स्वयेंचि[11] निजधामा[12] ॥ ३ ॥

---

१ रामचंद्र पाटील कोते. २ दिवस. ३ मरेल. ४ तात्या पाटील कोते. ५ रामचंद्र पाटील बरे झाले. ६ तात्या आजारी पडले. ७ विपरीत. ८ त्या ( दसऱ्याच्या ) दिवशीं ९ बरे झाले १० समाधिस्थ झाले. ११ स्वतःच. १२ वैकुंठवासी.

पाटिल निष्ठावंत शिरडिचे रामचंद्र नामा ॥
थोर व्याधिनें खिळिले शय्ये मिळे न आरामा ॥ ध्रु ॥

५३ ओवी

यवन शक तेराशे सद्तीस । तारीख नऊ मोहरम मास ॥
तारीख पंधरा अक्टोबर खास । सन एकोणिसशें आठरा ॥

५४ ओवी

अठराशें चाळीस शकाब्दवर । कालयुक्त नाम संवत्सर ॥
दक्षिणायन अश्विन मास थोर । वासर विजया दशमीचा ॥

५५ ओवी

धनिष्ठा नक्षत्र चंद्रमकरास । शूळ[1], विष्टि[2], मंगळवार दिवस ॥
घटि अठरा पळें अट्ठेचाळीस । दशमी खलास ते काळीं ॥

५६ ओवी

अपराण्ह व्यापिनी एकादशीस । दिवसा तिहींचे समयास ॥
मशीदींत साई जगन्निवास । शिरडीस अवतार संपविती ॥

५७ ओवी

अंबा जैसी अपत्यासी । सांडुनि जाय स्वलोकासी ॥
साइ माय विरहार्णवि आपणासी । लोटुनि गेली निजधामा ॥

५८ पद ( रुचती कां तीर्थयात्रा० या चालीवर )

जाण्या कां उचित वाटे निजधामा अंबिके ।
विरहानलिं लेकरांना लोटुनि गे चंद्रिके[3] ॥ धृ० ॥
वडवानल क्रोधरूपी भडकुनि गे चंडिके ।
करुणाब्धी आटला कां ह्रदये गे नंदके[4] ॥ जाण्या कां ॥

५९ मंदाक्रांता

गेलें गेलें अजि शिरडीचें तेज ऐश्वर्य गेलें ॥
नेलें नेलें मधुनि अमुच्या संत रत्नासि नेलें ॥

---

१ शळयोग. २ विष्टिकरण. ३ शीतळ प्रकाश देणारे. ४ आनंद देणारे.

केलें केलें हतविधिकरें[1] घोर दुष्पाप केलें ॥
झालें झालें खचित अमुचें नष्ट सौभाग्य झालें ॥

६० मंदाक्रांता

हा हा ! अंबे, त्वमसि अमुची ज्ञानशाला[2] विशाला[3] ॥
बाला आम्हां त्यजुनि, त्यजिसी पुण्य-काया-दुशाला[4] ॥
आम्हा बालांवरी जननि तूं कोपलीसेच वाटे ॥
फाटे, माते, हृदय अमुचें नावरे शोक दाटे ॥

६१ पद ( कवणें तुज गांजियलें० या चालीवर )

हाय हाय ! संतराय जाय हरपुनि । शोकानल खाय काय जाय करपुनी ॥ ध्रु० ॥
धाय धाय रडति सर्व गाय होउनी । दुःख घाय रुपति हाय, हृदयिं टोंचुनी ॥
काय साइ माय आम्हां गेली सांडुनी ॥ हाय हाय ॥ १ ॥
वक्ष भाल पिटिति पुरुष बायका मुलें । दीन लीन म्लान वदन कंठ ना खुले ॥
गेलें जणुं देहांतुनि तेज झिरपुनी ॥ हाय हाय ॥ २ ॥
ज्ञान भास्करास्त ! नभा कालिमा आली । शिरडि नगरि सर्व शून्य भासुं लागली ॥
दिसती दिशा दश उदास तेज लपवुनी ॥ हाय हाय ॥ ३ ॥
वृक्षपर्ण[5] अप्प्रवाह कांहिं ना हले ॥ श्वापद कृमि विहग कुलें होत व्याकुलें ॥
बालकां न स्तन्य[6] देति वसती मुरडुनी ॥ हाय हाय ॥ ४ ॥
तुजविण गे क्षण न सुचे दिवस यामिनी[7] । साइ जननि करुण स्वनीं[8] येइ धाउनी ॥
येशिन जरि प्राण जात हृदिं दारुनी ॥ हाय हाय ॥ ५ ॥

---

१ हातानें. २ परमार्थज्ञान देणारी शाळा. ३ मोठी. ४ मौल्यवान वस्त्र.

६२ अभंग

ज्यासि जाला नाहीं जन्म । त्यासि कैचें निजधाम ॥
संत नवा देह घेती । त्यांसि गेले गेले म्हणती ॥
जन्म क्षयातीत संत । सदा सर्वदा जीवंत ॥
त्यांचें अजत्वें जन्मणें । तैसें अनंतत्वें मरणें ॥
त्यांचें दिव्य जन्म कर्म । ज्ञानी जाणती हें वर्म ॥
ऐसा संतांचा अधिकार । कैसे जाणती पामर ॥
वर्मज्ञ ते मुक्त होती । कृष्ण परमात्मा बोलती ॥
बाळ विनवी सद्गुरु साई । देई दर्शन माझे आई ॥

श्री. ज्ञा. अ. श्लो ओ.

६३ ओवी

ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यात्वें निर्विकार ॥
जेथें पडे तेंचि सार । पुण्य भूमी ॥

दासबोध.

६४ कटाव

भव्य मंदिरीं दिव्य परिवरी । संगम स्वरीं प्राकारान्वित । समाधि साजे रुचिर गोजिरी । निद्रित साईमाय अंतरीं । प्रतिदिनिं प्रभात समयीं छान । डिंडिम वादन, सनई गान । कूपतोय, मंगल स्नान । भरजरि चीनांबर परिधान, पवित्र । लेंडी उद्यानांतील सुभग फुलांचे । गुच्छ सुवासिक नाना परिचे हार मनोहर । शेरे सुंदर पीत हरित दूर्वांकुर कोमल । तुलसी बेल सुगंध शीतळ । साईजननी समाधिवरती । भक्त वाहती । धूप दीप नैवेद्य चतुर्विध । पक्व स्वादु मधुर फलावलि । तांबूल दक्षिणा । आरति करुनी । दीर्घ स्वरानें मंत्रोच्चारें । पुष्पांजलि त्या समाधिवरती । वाहति प्रेमें । करिति प्रदक्षिणा प्रसाद वाटिति । ध्याती स्तविती । प्रणवरूपिणी विश्व मोहिनी । अर्धनारि नटेश्वरादि । नाना परिचे वेष धरित जो, प्रेमें वंदावा ॥

६५ आर्या

संत-शवा[1] म्हणती ना शव, ते शिव[2] देह तो रमेश[3] असे ॥
जेथें शव ती भूमी, पुण्यसमाधी स्मशान ना, विलसे[4] ॥

६६ स्रग्धरा

येती दिंड्या, पताका, किती तरि न मिति टाळ आणि मृदंगा ॥
प्रेमें गाती अभंगां, अळविती विभुला, सांडुनी दर्प-संगा ॥
स्वर्णीं चिर्त्तीं शिवेना, शवभय भजनीं घालिती नित्य पिंगा[5] ॥
संतां गा[6], तत्समाधीर्थ, समजुनि नमिती, जोडिती मोक्षगंगा[7]॥

६७ मंदाक्रांता

"बाबा बाबा" निशिदिनिं मना, बोल रे बोल बाबा[8] ॥
"बाबा" नामीं, कितितरि असे, दिव्य जादू अबाबा[9] ॥
बा, बालिश्य त्यज, शरण जा, त्या न भूपा, नबाबा ॥
बा, बाधाना[10], तुज यमगृहीं[11], जावयाची जबाबा[12] ॥

६८ मंदाक्रांता

मा मा तिष्ठ क्षणमपि मनो जीव-कुग्राम-देशे ॥
सौख्यागारं " शिव " इतिपुरं दूरपारे भवाब्धेः॥
अत्युत्कंठा प्रबल तरणी तत्र चेत्तेऽस्ति गंतुम्
त्वत्सान्निध्ये, वसति कुशलः साई सत्कर्णधारः ॥

६९ अभंग

शरण साई चरणीं गेला । त्यानें भवबंध तोडीला ॥ त्यानें ॥
हाणि काळासी तो लाथा । काळ ठेवी तत्पदिं माथा ॥ काळ ॥
ऐसा संतांचा अधिकार । साई संतांचे सरकार ॥ साई ॥

---

१ प्रेताला. २ मंगल. ३ परमात्मा विष्णु. ४ शोभते. ५ अभिमानाची संगती. ६ दमेपर्यंत. मान ओंवाळणें किंवा वर्तुलाकार फिरवणें. ७ संतांच्या समाधीसच संतशरीर समजून. ८ अरे बाबा. ९ आश्चर्यवाचक. १० बाबांना. ११ भीते. १२ मृत्यूची.

करूं सरकारा मूजरे । आपण चरणाचे हूजरे ॥ आपण ॥
मलगे गुप्त मुक्ती ठेवा । अन्य भक्तांना तो द्यावा ॥ अन्य ॥
बाळ विनवी नित्य सेवा । देइ तवपद भक्ती सेवा ॥ देइ ॥

७० अभंग

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥
नलगे मुक्ती धन संपदा । संत संग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हांसी ॥

७१ आरती श्रीसाईबाबांची

आरती साइबाबा । सौख्य दातार जीवा । चरण रजातळीं । निज दासां विसावा भक्तां विसांवा ॥ आ० ॥ जाळुनि अनंग स्वस्वरूपीं राहे दंग । मुमुक्षु जना दावी । निज डोळा श्रीरंगा ॥ डो० ॥ आ० ॥१॥ जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना । ऐसी तुझी ही माव ॥ तु० ॥ आ० ॥२॥ तुमचें नाम ध्यातां । हरे संसृति व्यथा । अगाध तव करणी । मार्ग दाविसि अनाथा ॥ दा० ॥ आ० ॥ ३ ॥ कलियुगीं अवतार । सगुण ब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे । स्वामी दत्तदिगंबर ॥ द० ॥ आ० ॥ ४ ॥ आठां दिवसां गुरुवारी । भक्त करिती वारी । प्रभुपद पाहावया । भव भय निवारी ॥ भ० ॥ आ० ॥ ५ ॥ माझा निज द्रव्य ठेवा । तव चरणरज सेवा । मागणें हेंचि आतां । तुम्हा देवाधिदेवा ॥ ॥ आ० ॥ ६ ॥ इच्छित दीन चातक । निर्मल तोय निज सूख । पाजावें माधवा । सांभाळ आपुली भाक ॥ आ० ॥ भा० ॥ आ० ॥ ७ ॥

### ७२ आरती श्रीज्ञानेश्वर महाराजांची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्य तेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ धृ० ॥
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥
कनकाचें ताट करीं । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबरहि । साम गायन करी ॥ २ ॥
प्रगट गुह्य बोले । विश्वब्रह्मचि केलें ।
रामा जनार्दनी । पायीं मस्तक ठेविलें ॥ ३ ॥

### ७३ आरती श्रीदत्तगुरूची.

काषायांबर खंड सुनिर्मित कौपीनम् ।
दंडकमंडलु मंडन मंडित मूर्धानम् ।
रिपु मंडल मदखंडन पंडित विज्ञानम् ।
योग कला कलिताखिल स्वंपद महिमानम् ॥
जयदेव जयदेव जययति यूथपते । मामुद्धर
नरसिंह सरस्वति विमल मते ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥
पद्मासन विजयश्री सेवित पादाग्रम् ।
अर्धोन्मीलित नयन निरीक्षित नासाग्रम् ।
प्रणवांत प्रतिपाद्य स्वानुभवाकाग्र्यम् ॥
जगदुद्धामनि धामनि जगदीक्षा व्यग्रम् ।
जयदेव जयदेव ॥ २ ॥
हरिकीर्तन समयाधृत वैकुंठ निवासम् ।
पंचीकरण महावागुपदेश विलासम् ।

निजनैगम महिमामृतवंतं त्रिवासम् ।
वंदे रुक्म सुतार्चित पादुकमविनाशम् ॥
जयदेव जयजयदेव ॥ ३ ॥

७४ अभंग

घालीन लोटांगण । वंदीन चरण । डोळ्यांनि पाहिन रूप तुझें ॥
प्रेमें आलंगिन आनंदें पूजिन । भावें ओंवाळिन म्हणे नामा ॥

७५ उपजाति वृत्तम्

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ॥
करोमि यद्यत्सकलं परस्मै । नारायणा येति समर्पयामि ॥

७६ स्रग्विणी वृत्तम्

अच्युतं केशवं राम नारायणम् । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिम् ॥
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभम् । जानकी नायकं रामचंद्रं भजेत् ॥

७७ अनुष्टुभ् वृत्तम्

हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्त महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज की जय.

श्री सच्चिदानंद सद्गुरु साइनाथ महाराज की जय.

श्री सच्चिदानंद सद्गुरु सर्व साधु संत महाराज की जय.

ही वाक्सुमनांजलि श्रीसमर्थ सद्गुरु सच्चिदानंद बाबांचे पुण्य चरणीं नम्रता व अत्यादरपूर्वक नितांत प्रेमभावानें समर्पण असो.

ठाणें,
भाद्रपद कृष्ण ५, बुधवार
शके १८५२.
ता. ३०-९-३१

संतदासानुदास,
श्री बाबांच्या चरणरजाचा दासानुदास
बाबांचा बाळ.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावीं. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांना तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेख सोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

अंक १०, वर्ष ८ ] मार्गशीर्ष [ शके १८५३



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।
—शंकराचार्य.

—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.

| | |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... ... | १–२० |
| श्री शिरडी संस्थानचा शके १८५३ सालचा श्रीगुरुपौर्णिमेच्या जमाखर्चाचा तक्ता ... | १--३ |
| अहिल्योद्धार ... ... ... ... ... | १-१० |

# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पाडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक.

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकल अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावीं. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांना तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ११ अंक १ ] चैत्र [ श. १८५६

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| पाश्चात्यांचें स्वानुभवयुक्त आत्मसंशोधन ... ... | १–१२ |
| अनुभव ... ... ... ... | १३–१५ |
| मार्च महिन्याचें शिर्डीवृत्त ... ... ... | १६–२१ |
| एप्रिल महिन्याचें शिर्डीवृत्त ... ... | २२–२३ |
| निंबवृक्षाखालीं स्थापन केलेल्या बाबांच्या पादुकांची मूळ हकीकत ... ... ... | २४–२८ |
| त्रैवार्षिक निवडणुकीकरितां शिर्डीसंस्थानच्या भक्तमंडळाच्या सभासदांची यादी ... ... ... | २९–३२ |


## विनंति.

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

५१ E, पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वीं छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

—प्रकाशक.

# पाश्चात्यांचें स्वानुभवयुक्त आत्मसंशोधन

श्री. संपादक महाशय,

श्री. साईलीला मासिक यांस वि. वि.

खालील मजकुरास आपल्या मासिकांत कृपा करून जागा द्यावी ही नम्र विनंती.

या वर्षाच्या गेल्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेच्या 'बॅांबे सेंटिनल'' या वर्तमानपत्रांत (London Doctor asked to resign. Book written on Black magic upsets county councillors). 'लंडन शहरांतील एका नामांकित डॅाक्टराला राजीनामा द्यावयास सांगितलें. त्यानें एक पुस्तक कुटील इंद्रजालवर लिहिल्यामुळें लंडन शहर कौन्सिलरांस राग आला' या सदराखालीं एक अत्यंत आकर्षक लेख आला. तो वाचून हें त्या डॅाक्टरानें प्रसिद्ध केलेलें पुस्तक काय आहे तें वाचून पाहावें म्हणून उत्कट जिज्ञासा उत्पन्न झाली. परंतु घरची लायब्ररी पुढें योग्य जोपासना होणें दुस्तर असें वाटल्यावरून, व श्रीमत् परमहंस परिव्राजक श्री गाडगेबुवा सन १९३२ च्या डिसेंबर महिन्यांत घरीं आले असतां त्यांच्या मागणीवरून ती लायब्ररी त्यांना आदरपूर्वक अर्पण केली, आणि तिची व्यवस्था त्यांनीं श्री नाशीक येथील त्यांच्या अद्वितीय रमणीय मठांत ठेवली, या कारणांमुळें आणि उतारवयांत आतां मजल जवळ आली आहे म्हणून आणखी दुसरी पुस्तकें गोळा करावयाची नाहींत, असा विचार केल्यामुळें तें पुस्तक विकत घेण्याच्या मनाच्या उत्कंठेला लेखकानें दाबलें.

परंतु जेव्हां त्याच वर्तमानपत्राच्या त्याच महिन्याच्या ता. २४ च्या अंकांत खालीलप्रमाणें मथळ्याचा लेख आला, तेव्हां तें पुस्तक विकत घेऊन संग्रह करण्याची मनाची ओढ अनावर झाली.

तो लेख येणेंप्रमाणें प्रसिद्ध झाला आहे सदरहू डॉक्टर म्हणतात कीं त्यांनीं ("Weird things Doctor said he saw. Dead man brought to life. Fig tree witherd by command.") **आश्चर्यकारक गोष्टी स्वतः पाहिल्या. मृत मनुष्य जिवंत झाला. अंजिराचें झाड हुकमावरून सुकून गेलें.** सदरील अंकांत बॉंबे सेन्टिनल पत्र लिहितें:—

(The Sentinel in its issue of January 1st published a review of a book called Invisible Influence (Rider 5 sh.) by Dr. Cannon, which drew on the head of its famous author a storm of controversy culminating in the L. C. C. asking him to resign.

Within a week Dr. Cannon appeared before the appeals committee of the L. C. C. and convinced those hardheaded businessmen that there was a great deal in what he had said in his book. After this, they reinstated him and gave him a better post.

We publish below an interview with Dr. Cannon by John Macadam as appeared in the Sunday Despatch)

सेंटिनलनें ता. १ जानेवारीच्या अंकांत डॉ. क्यानन यांनीं आपल्या **अज्ञात-प्रेरणा** ( छापणार रायडर. किं. ५ शिलींग) या पुस्तकावर लेख लिहिला होता. त्या पुस्तकावरून, **तें पुस्तक लिहिणाऱ्या प्रसिद्ध डॉक्टरावर मोठी खळबळ उठून तुफान माजलें, आणि शेवटीं लंडन काऊन्टी कौन्सिलानें** ( लंडन शहराच्या म्युनिसिपालटीनें ) **सदरहू डॉक्टरांस राजीनामा देण्यास सांगितलें.**

त्याप्रमाणें एका आठवड्याच्या आंत सदरहू डॉक्टर त्या कौन्सिलाच्या अपील कमिटीपुढें हजर राहिले, आणि **त्या मठ्ठ डोक्यांच्या व्यापाऱ्यांची आपण लिहिलेल्या पुस्तकांतल्या मजकुरां-**

**तल्या सत्यतेविषयीं खातरी पटविली. त्यानंतर त्यांनीं त्यांना त्यांच्या जागेवर पुन्हां नेमिलें, इतकेंच नाहीं तर आणखी वरिष्ठ प्रकारची जागा त्यांना दिली.**

सेन्टिनलनें त्यानंतर डॉ. क्यानन यांजबरोबर जॉन मकाडम याचा संवाद जो सन्डे डिस्प्याच पत्रांत प्रसिद्ध झाला आहे,तो छापिला आहे.

हें सर्व वाचून हें (Invisible Influena) ज्याला आपण **अज्ञात प्रेरणा** म्हणूं, तें काय आहे हें वाचण्याची इच्छा अनावर झाली. आणि तें पुस्तक खरेदी करण्यासाठीं मुंबईंत तारापुरवाला यांच्या दुकानीं लेखक गेला. त्यांच्याकडचीं सर्व पुस्तकें संपलीं होतीं. त्यानंतर थ्याकर कं.कडे गेला, त्यांच्याकडे ही पुस्तकें संपलीं होतीं. पण त्यांनी एअर मेलने ऑर्डर पाठवूं, त्याचा जादा खर्च पडणार नाहीं, असें आश्वासन दिल्यावरून एक प्रत त्यानें मागवली.

घरीं आल्यावर डॉ. क्यानन यांजला एक पत्र लिहिलें, त्यांत सेन्टिनलच्या टीकेवरून आपण पुस्तक खरीद करण्यास गेलों व तें न मिळाल्यामुळें एअर मेलनें एक प्रत मागितल्याचें त्यांना कळविलें, आणि त्यांना व त्यांच्या मित्रमंडळीला कदाचित् (Shri Sai Baba of Shirdi) श्रीसाईबाबा ऑफ शिरडी या पुस्तकाचा उपयोग होईल, असें वाटून तीन प्रती पाठविल्याचें कळविलें.

या पत्राचा जबाब ता. ९ मार्च १९३४ ला मिळाला. त्यांत डॉ. क्यानन कळवितात कीं, त्यांना फक्त एकच प्रत मिळाली* आणखी प्रति पाठविल्यास, त्या ते योग्य अशा जिज्ञासू गृहस्थांस देऊं असें लिहिल्या-वरून थ्याकर कं. मार्फत १० प्रती रजिस्टर पोष्टानें डॉ. क्यानन यांजला पाठविल्या. डॉ. क्यानन, त्यांच्या पत्रांत विशेष आश्चर्याची गोष्ट कळवितात

* ( प्रति रजिस्टर पोस्टानें न पाठविल्यामुळें कोठेंतरी दोन प्रती गहाळ झाल्या असाव्या, जें कळण्यास साधन नाहीं. )

कीं, **श्रीसाईमाउलाचें एक उत्तम छायाचित्र त्यांच्या घरीं आहे.**

श्रीसाईमाउली त्यांच्या घरीं जाऊन कशी बसली, हें डॉ. क्याननच जाणें. लेखकाची बुद्धि चालत नाहीं, त्यांच्यावरचें अरिष्ट श्रीसाईमाउलीनेंच टाळलें. असें लेखकाला वाटतें.

त्याच टपालानें थ्याकर कं. नें कळविलें कीं, डॉ. क्यानन यांची लेखकानें मागितलेली प्रत आली आहे, व त्याप्रमाणें, कोटांत दोन दिवसांनंतर जाऊन ती विकत घेतली. पुस्तक अत्यंत वाचनीय व विचार करण्यासारखें आहे. ज्यांनीं साईबाबांच्या चरणीं बसून त्यांच्या **लीला** पाहिल्या त्यांना त्यांतले लेख मुळींच आश्चर्यकारक वाटणार नाहींत. परंतु जे आधुनिक विद्वान् श्रीसाईमाउलीच्या लीलांविषयीं सांशक आहेत, त्यांनीं तसेंच सर्व डॉक्टरमंडळींनीं डॉ. क्यानन यांचें Invisible Influence हें पुस्तक तसेंच डॉ. अलेक्स अर्स्किन यांचें Hypnotists case Book हीं पुस्तकें जरूर वाचून त्याच प्रमाणें डॉ. रेळे यांचें The Mysterious Kundalini आणि फेलिक्स गुयो यांचें Yoga for the west हीं पुस्तकें जरूर अभ्यासपूर्वक अवलोकनांत घेऊन मनन करून आपला उत्कर्ष करून घ्यावा.

श्रीसाईबाबा ऑफ शिरडी हें इंग्रजी पुस्तक, संपादक महाशय उगीच प्रसिद्ध झालेलें नाहीं. महाराष्ट्र भाषा जाणणारांनीं आपल्या गुजराथी व इतर मराठी भाषा न जाणणाऱ्या स्नेही मंडळांत या पुस्तकाचा जरूर फैलाव करावा, आणि तसें केल्यानें त्यांना डॉ. क्यानन यांच्या व डॉ. अलेक्स अर्स्किन यांच्या पुस्तकाचें मर्म कळेल.

या दोन्ही विद्वानांनीं लिहिलेल्या ग्रंथांचा सारांश असा दिसतो. येथें नमूद केलें पाहिजे कीं, लेखक एक अत्यंत अल्पमति मनुष्य आहे. सर्व आयुष्य मजूरवर्गांत गेलेलें. नाहीं जुन्या ग्रंथांचें अर्थपूर्वक अध्ययन, नाहीं

पाश्चात्य मानसशास्त्र ग्रंथांचें परिशीलन, नाहीं थिओसोफिस्ट ग्रंथांचें वाचन, नाहीं विद्वानांबरोबर वादविवाद. केवळ **श्रीसाईबाबांच्या पायांजवळ बसून जो कांहीं अल्प अनुभव आला त्यावर सर्व भिस्त,** तेव्हां आधुनिक विद्वान त्याला सर्व बाजूंनीं क्षमा करतील असें मानून आपल्या अल्पमतिप्रमाणें नव्याजुन्याचा मेळ वरील दोन ग्रंथांनीं कसा बसतो हें प्रतिपादन करण्याचें धाडस तो करीत आहे,

सदरहू दोन्ही विद्वानांनीं आपल्या पुस्तकांत Hypnotism and clairvoyance म्हणजे

## । मानसिक संशोधन व मानसिक दूरदृष्टि ।

या दोन्ही शास्त्रांना अत्यंत उच्च कोटीचें स्थान स्वतःच्या अनुभवावरून दिलें आहे. या शास्त्रांचें अध्ययन मनुष्य करूं शकतो, आणि त्यांवरून इतर व्याधिग्रस्तांना त्यांच्या दुस्तर व्याधींपासून तो बरें करूं शकतो यावर त्याचा स्वानुभवांमुळें पूर्ण कटाक्ष आहे.

अर्धेमुर्धे साधन करणाराला कांहीं क्षुद्र सिद्धि प्राप्त होतात आणि त्यांमुळें तो इसम भोंदु साधू होऊन इतरांना फसवूं शकतो, नाहीं असें नाहीं ! परंतु, त्याचें तें फसवणें टिकूं शकत नाहीं. शेवट त्याच्या फसवेगिरीचा ऱ्हास व्हावयाचाच ही ठरीव गोष्ट आहे. हें डॉ. क्यानन यांनीं सुरत शहरांतल्या एका गोष्टीवरून सप्रमाण सिद्ध केलें आहे. अशाच प्रकारचा एक साधु म्हणविणारा क्षुद्रबुद्धि, एका चांगल्या गृहस्थाला ठकवीत होता त्याची कान उघाडणी श्रीसाईबाबांनीं केली, व त्या गृहस्थाच्या बायकोला म्हणाले, "आये तो तुझ्या संसाराचा सत्यानाश करावयास बसला होता पण मीं तें त्याला कसें करूं देईन !" ही हकीकत लेखकाला ठाऊक आहे म्हणून Hypnotism म्हणजे ज्याला आपण वर दर्शविल्याप्रमाणें आणि दुसऱ्या सुयोजित शब्दाच्या अभावीं **मानसिक संशोधन** या नांवानें संबोधूं त्या या शास्त्राच्या उच्च कोटीची उपयुक्तता या दोन विद्वानांनीं निदर्शनास

आणली आहे. ते म्हणतात कीं, आपणां सर्वांमध्यें अमर्याद सामर्थ्य आहे. आत्मविश्वासानें तें प्राप्त करून घेतां येतें, उत्तम स्वानुभवयुक्त गुरूमुळें योग्य वळण प्राप्त होऊन, आपण आपल्या मानसिक सामर्थ्याचा पूर्ण विकास करून दु:खित व व्यथित व्यक्तींना त्यांच्या असाध्य आधींव्याधींपासून संपूर्णपणें मुक्त करूं शकतों. या दोन पुस्तकांचा संक्षिप्तरूपें सारांश येणें प्रमाणें.

१ ईश्वर आहे. त्याचें अस्तित्व निखालस एकच **सत्य** (ज्याला आपण एकं सत् म्हणतों.)

२ त्या ईश्वराचें शाब्दिक वर्णन करावयाचें म्हणजे तो ( Great Mind ) म्हणजे आपल्याप्रमाणें चित्स्वरूपी, म्हणजे परमात्मा.

३ त्या ( Great mind ) पासून चैतन्याची उत्पत्ति.

४ हें चैतन्य दिसणाऱ्या व न दिसणाऱ्या सृष्टींत पूर्णपणें आहे. सर्व दृश्य व अदृश्य सृष्टीची उत्पत्ति स्थिति आणि लय. या चैतन्यापासून.

५ चैतन्याच्या सर्व प्रकारच्या ( vibrations ) लहरींमुळें सर्व दृश्य व अदृश्य सृष्टि निर्माण झाली आहे.

६ सर्व प्राण्यांत मानसिक प्रगतींत मनुष्य श्रेष्ठ आहे.

७ त्याच्यामध्यें असणारें ( Subconcious mind ) ज्याला हे विद्वान ( Soul ) म्हणजे आत्मा या संज्ञेनें संबोधितात त्या आत्म्याचें आणि ( The great mind ) म्हणजे सर्वव्यापी सर्वज्ञ परमात्म्याचें पूर्णपणें तादात्म्य आहे.

८ म्हणून मृत देह जीवंत करतां येतो ( " अशक्य तें काय तुम्हा नारायणा, निर्जिवा चेतना आणावया. " श्रीतुकाराम महाराजांची अनुभवजन्यवाणी, खरी पडते. )

९ मनुष्याला अधांतरीं सदेह फिरतां येतें. तसेंच आपला देह जागच्या ठिकाणीं. निद्रिस्त ठेवून आपल्याला जगतीतलावर स्वैरसंचार करतां येतो. ( श्रीरामदासप्रभृति श्रीब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर-यांचीं चरित्रें अवलोकनांत घ्यावीं. )

१० ( Hypnotism) ज्याला आपण अज्ञानानें **नजर-बंदी** या क्षुद्र पायावर ठेविलें आहे त्याला **मानसिक संशोधनाच्या** उच्च पदवीवर पोंहचवून या शास्त्राधारें साधारण रोग तर काय परंतु पक्षघातादि असाध्य रोग कायमचे बरे झाले आहेत.

१२ या शास्त्राधारें दूरदृष्टि प्राप्त करवून या जगतीतलावर कोणीही मनुष्य कोणत्या वेळीं काय करीत आहे, हें कळतें.

१३ त्यामुळें खुनी इसम शोधून काढून खोटया साक्षीवर निरपराधी मनुष्यास शासन होणार नाहीं.

१४ गुन्हेगारांना दहशत पडून त्यांची प्रवृत्ति चांगल्या आचरणांत होईल. ( अपिचेत् सुदुराचारो —गीता )

१५. आत्मविश्वास जागृत होऊन आणि तो अपरिमित वाढून, तो मनुष्य पुढारीपणास सर्व प्रकारें लायक होऊन जनता त्याप्रमाणें आत्मविश्वास-युक्त होऊन धडाडीचीं कृत्यें करण्यास सामर्थ्यवान होते—( श्रीशिवाजी-महाराजांना श्रीभवानीचा संदेश व त्यामुळें मराठा जनतेचें आत्मविश्वास-युक्त पुढील आचरण )

१६ ढोंगी साधु व त्यांचीं कारस्थानें स्वाभाविक रीतीनें उघडकीस येऊन, जनता फशी पडणार नाहीं.* ( उदाहरणार्थ श्रीमंबाजी बुवा व श्रीतुकाराम महाराज )

---

१ श्री मंबाजीबुवांना निवळ स्वार्थपरायण नीच वृत्तिच्या ढोंगी साधूंच्या कंपूंत घालतां येणार नाहीं. त्यांचा वृथाभिमान नष्ट होऊन श्री तुकाराम महाराजांचे ते एक उत्तम अनुयायी बनले हें विसरतां कामा नये —संपादक.

१७ ही कला, ही विद्या, साध्य आहे हें या दोन्ही विद्वानांच्या पुस्तकांवरून स्पष्ट निदर्शनास येतें. या विद्येकडे पाश्चात्यांचें लक्ष वेधून आज कित्येक वर्षें त्यांचे सतत यत्न चालू आहेत. मात्र ही विद्या संपादन करतांना नन्नाचा पाढा मनांतून साफ काढून टाकला पाहिजे, ( मॉ. कोहे यांचे प्रयोग व त्यासंबंधानें एक लेख मागें श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध झाला आहे )

१८ हे दोन्ही विद्वान या शास्त्राचे दोन मार्ग आहेत हें दाखवितात. एक, ज्याला ते उजव्या हाताचा रस्ता, म्हणजे सरळ मार्ग म्हणतात. त्यानेंच आत्मोन्नति होऊन मनुष्य देवाच्या कृपेला पात्र होऊन, त्याच्या करवीं " जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टवीती नाना परी " हा सुपरिणाम दिसून येतो.

दुसरा मार्ग, ज्याला ते Left Hand म्हणजे वाम मार्ग म्हणतात, त्यानें जारण, मारण ( मूठ मारणें ) वशीकरण, वगैरे कुविद्या प्राप्त होऊन तो मनुष्य आपल्या क्षुद्र स्वार्थासाठीं इतरांचें सर्व प्रकारें, वाईट करण्यांत मागें पुढें पहात नाहीं. सर्व ढोंगी साधू या मार्गाचेच अनुकरण करीत असतात.

वरील प्रकारचीं विधानें या पुस्तकांच्या वाचनानें जीं दिसलीं तीं श्रीलीलेच्या विद्वान वाचकांपुढें अत्यंत विनम्र भावनेनें सादर करण्यांत येत आहेत.

माझा मित्र प्रभुप्राप्तीसाठीं प्राणायामाचें साधन करीत असतां सहा महिन्याच्या आंत त्याला दूरदृष्टि प्राप्त होऊन, त्याच्या कारखान्याच्या एका विशिष्ट भागाला आग लागल्याचें त्याला दिसलें व प्रभुप्राप्तीप्रीत्यर्थ प्राणायाम करीत असतां ही सिद्धि हें एक विघ्न समजून त्यानें साष्टांग नमस्कार घालून " आजपासून प्राणायाम बंद " असा जो संकल्प केला व ज्या संकल्पाला थोडया दिवसांनंतर श्रीसाईबाबांच्या पायांपाशीं तो बसला असतां " काय रे तुला रांड चिंठकूं पाहात होती ! अशा रांडांशी आपलें काम

नाहीं " असें ते म्हणाले. ही गोष्ट श्रीलीलेंत कांहीं वर्षांमागें प्रसिद्ध झाली आहे. तिच्याविषयीं विचार करतां याप्रमाणें खुलासा वाटतो.

१ प्राणायामाच्या साधनानें प्रभुप्राप्तीसाठीं अथवा जगाच्या कल्याणाच्याच सद्हेतूनें ही सिद्धि सहा महिन्यांच्या आंत प्राप्त होतेच होते.

२ श्रीसाईबाबांनीं माझ्या मित्राला वरील सिद्धिपासून कां परावृत्त केलें याचें कारण या सिद्धिच्या नादीं लागून तो एक निवळ ढोंगी साधु होऊन त्यानें परमार्थाचें दुकान बाबांचा चेला मिरवून घातलें असतें.

३ म्हणून पूर्ण तयारीनें, पूर्ण सद्हेतुनें, उदरंभर वृत्तीनें न वर्ततां, जर मनुष्य, आपलें वर्तन शुद्ध ठेवून प्राणायामादि साधनांचा उपयोग करील तर त्याला व जनतेला अपरिमित फायदा होईल.

४ ही तयारी आपणां हिंदवासियांत थोडयाबहुत प्रमाणांत दिसून येते; लहान बालकांच्या वर्तनांकडे आपण बारकाईनें लक्ष देत नाहीं. तीन वर्षांचें बालक होईपर्यंत कधींकधीं दूर राहणारें आपल्या मायेचें मनुष्य जसें "आजी आली" अथवा "काका आले," "बाबा आले" असें स्वतःचे खेळ खेळत असतां तें बालक सहज लीलेनें बोलून जातें, आणि त्याप्रमाणें कांहीं वेळानें आजी अथवा काका, बाबा, हे न धारतां हजर होतात, हें त्या मुलाला तें मनुष्य त्याच्या राहत्या घरांतून निघाल्याचें दिसतें काय? अथवा Telepathy म्हणजे **मानसिक संवेदन** या त्याच्या आणि परमात्म्याच्या तादात्म्य भावनेनें कळतें काय? आपण लहान मुलांच्या बोलांकडे सूक्ष्म लक्ष न देऊन खाडकन् कांहींतरी कठीण शब्द बोलून या वृत्तिच्या विकासाला अवसर न देऊन ती वृत्ति दाबून टाकीत असतों. बिचारें तें मूल आमच्या दटावण्यानें घाबरून जाऊन त्यामुळें त्याच्या त्या अमोलिक वृत्तीचा लय होऊन आमच्यासारखेंच तें पुढें खडतर अज्ञानी बनतें!!

असो ! मानसशास्त्रवेत्ते या सदरील पुस्तकांचें अध्ययन करून त्यांतलें मर्म समजून आमची प्रवृत्ति उन्नतीकडे करतील अशी आशा आहे

काय आश्चर्याची गोष्ट कीं, " परमेश्वर नाही " असें मानण्यांत आमची अलीकडली तरुण सुशिक्षित मंडळी अभिमान बाळगते. अलबत त्यांचा अंतरात्मा त्यांनां म्हणतो "बरें बाबा ! पुढें पाहूं" आणि परमेश्वर दुरावतो. तर मग अशा वृत्तीच्या तरुणांपासून आत्मविश्वासयुक्त धडाडीच्या वर्तनांची गोष्टच कशाला ?

आपणांमध्यें काय अपरिमित सामर्थ्य आहे याची कल्पना त्यांना येणारकशी ? सगळाच नन्नाचा पाढा कीं हें सर्व झूट आहे. मग पुढें प्रगति व्हावी कशी ?

असो ! **ज्या डॉ. क्याननसाहेबांनीं लंडन शहरांतल्या मड्ड डोक्यांच्या व्योपाऱ्यांना आपल्या अनुभवयुक्त ज्ञानानें गारेगार केलें,** त्यांच्याच तत्संबंधानें त्या पुस्तकांतील खालील वाक्याचा उतारा घेतों:—

"Well I remember his (Mr. Erskine's) retort to an unreasonable critic, that, **ignorance** is the want of real knowledge; **stupidity** the inability to aquire knowledge and **obstinacy** just miserable conceit."

"एका हेकडखोर वृत्तीच्या टीकाकाराला त्यांनीं ( अरस्कीन यांनीं ) दिलेलें उत्तर मला चांगलें स्मरतें. **अज्ञान म्हणजे पूर्ण ज्ञानाचा अभाव; मूर्खपणा म्हणजे ज्ञान प्राप्त करून घेण्याची अनिच्छा** आणि **हटवादीपणा म्हणजे** क्षुद्र**अहंकारवृत्ति***

डॉ. क्यानन यांनीं आपलें पुस्तक आबालवृद्धांना कळेल अशा साध्या व सरळ इंग्रजी भाषेंत लिहिलें आहे. त्यांत शाब्दिक अवडंबर मुळींच नाहीं. बायबलाचे आधार वेळोवेळीं घेतले आहेत. ते आधार आपणाला सहज

कळतात. सैतान या व्यक्तीची योजना केली आहे कारण ती योजना ते न करते तर उपरनिर्दिष्ट केलेल्या मट्ठ डोक्यांच्या इंग्रजी व्यापाऱ्यांना त्यांच्या ग्रंथांचें रहस्य न कळतें, मात्र ही योजना करताना सत्य बाजूस सारलें नाहीं. आपणच आपले खरे शत्रु व मित्र असल्याचें त्याच वेळीं त्यानीं जोरदार भाषेंत प्रतिपादन केलें आहे. ईश्वरप्राप्तीपासून दूर सारणारा आपला वृथाभिमान हाच सैतान.

त्यांचें पुस्तक वाचतांना श्री साईमाऊलीच्या चरणापाशीं घडलेल्या एका प्रसंगाची आठवण होते. ही गोष्ट मागें श्रीसाईलीलेंत आली आहे तथापि तिचें या ठिकाणी पुनरपी लेखन करावें असें वाटतें.

श्रीचरणांपाशीं माझा स्नेही आणि त्याची बायको बसले असतां, बाई म्हणाल्या, "बाबा! भुतेंखेतें आहेत काय"—या बाईलाही दृष्टि होती—बाबा म्हणाले "होय आये! आहेत खरीं, परंतु तीं आपलें कांहींपण वाईट करणार नाहींत."

डॉ. क्यानन यांचें पुस्तक वाचून झाल्यावर श्री साईबाबांच्या या वाक्याचें स्मरण ठेवून "समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळी कोण आहे!" या समर्थांच्या उक्तीचें मनन करून, समर्थांच्या वचनाच्या आधारें आपण खरे सामर्थ्यवान कसे होऊं याचा अभ्यास करण्याला आपलें मन तयार होतें.

ज्या साईमाउलीच्या चरणांपाशीं व त्यानंतर त्यांच्या लीलांचे अनेक गोड व अद्भुत प्रकार पहाण्याचा सुयोग मिळाला व मिळत आहे त्या गोड साईमाउलीचे गुणानुवाद गाऊन व डॉ. अलेक्झांडर क्यानन यांच्या वरीं तिचें वास्तव्य अनेपेक्षेबाहेरचें असलेलें कळून त्या माउलीच्या उत्साहजनक चरणांला हा अज्ञानी लेखक अत्यंत विनम्र भावनेनें वरील लेख अर्पण करीत आहे.

१७–४–३४ "म्हातारा"

वरील लेख वाचून पान ७ कलम ९ हें अवलोकनांत घेतां, ही स्थिती प्राप्त झाली असतां " माझें मरण पाहिलें म्यां डोळां " हें संतवाक्य खरें पटतें. मग त्या व्यक्तीला जन्ममरण हें त्याच्या स्वेच्छेची गोष्ट आहे, हें उघड आहे.

बहुतेक संत आपल्या निर्याणाची अचूक वेळा कितीतरी दिवसांपूर्वीं सांगून गेले आहे. तसेंच त्यांना वाटल्यास आपला देह टाकून योग्य त्या शरीरांत प्रवेश करून जगाच्या हितासाठीं आपलें पुढील कार्य करतां येतें. सबब ते अयोनिज असल्यास आश्चर्य नाहीं; आणि त्यांच्या जन्मासंबंधीं आगेपिच्छा त्यांच्याशिवाय इतरांना कळणें दुस्तर आहे.

डॉ. अलेक्झाडर क्यानन. M. D., M. A., F. R. G. S. यांचें Invisible Influence हें पुस्तक गेल्या ऑक्टोबर महिन्यांत प्रसिद्ध झालें. त्यानंतर दुसरी व तिसरी आवृत्ति डिसेंबर महिन्यांत. चवथी, पांचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी आवृत्ति जानेवारी १९३४ च्या महिन्यांत ! पहा पाश्चात्यांची ज्ञानप्राप्तीची पिपासा ! आणि आमच्या येथें हा खजिना प्राप्त करून घेण्याचीं साधनें भरपूर असतां त्यांची अनास्था ! !

खार<br>
२०–४–३४

संपादक,<br>
श्रीसाईलीला

# अनुभव

रा. रा. रामचंद्र आत्माराम तर्खड, खार रोड, यांस

सौ. पार्वतीबाई वसंतराव कीर्तिकर हिचा नमस्कार. मी एक खालीं लिहिलेल्याप्रमाणें श्रीसाईबाबानें दिलेला अनुभव आपणांकडे पाठवीत आहें, तो आपण वाचून योग्य वाटल्यास श्रीसाईलीलेंत दाखल करावा.

ता. १६ नोव्हेंबर १९३३ रोजीं कुटुंबांतील सर्वत्र मंडळी श्रीक्षेत्र गाणगापुरास गेलों; तेथें थोडे दिवस राहून श्रीक्षेत्र शिर्डीस डिसेंबर महिन्यांत गेलों. आम्ही श्रींच्या समाधिगृहांत दर्शनास गेलों असतांना चिरंजीव नंदकुमार ह्याची नजर श्रीबाबांच्या समाधीवर पांघरलेल्या तांबडया शालूवर गेली व तो म्हणाला, 'आई, तो समाधीवर पांघरलेला शालू किती छानदार दिसतो पाहा!' तेव्हां मी त्याला म्हणालें, 'जर श्रीबाबांनीं तुझी मुंज फाल्गुन किंवा चैत्रांत घडवून आणली, तर आपणसुद्धा श्रीबाबांच्या शिर्डीस येऊन त्यांच्या समाधीवर कांहीं तरी वस्तु अर्पण करूं.' त्याप्रमाणें श्रीबाबांनीं मुलाच्या मुंजीचा योग चैत्र महिन्यांत जुळवून आणला व आम्हीं श्रीसाईबाबांस नवस बोलल्याप्रमाणें श्रीशिर्डीस जाऊन त्यांच्या समाधीला चंदनाचा लेप केला.

कळावें, लोभ असावा, ही विनंति.

आपली नम्र,

**सौ. पार्वतीबाई वसंतराव कीर्तिकर**

# माझा नवा अनुभव

श्री. रा. रा. बाबासाहेब यांचे चरणी शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. खालीं मीं आपला ताजा अनुभव दिला आहे, तो जर पसंत असेल, तर साईलीलेच्या वाचकांकरितां प्रसिद्ध करावा. नांवप्रसिद्धि नको.

आपला कृपाभिलाषि

**साईभक्त**

पार्ले ता. ११–२–३४

डिसेंबर १९३३ च्या दुसऱ्या आठवड्यांत मी एकाएकीं तापानें आजारी पडलों व ताप दोषी ठरला. गांवांतील डाक्टरचें औषध सुरू केलें, परंतु माझा पहिला डोस श्रीसाईबाबांची उदी. नवव्या दिवशीं घाम येऊन ताप तर निघाला, परंतु मध्यंतरीं अकस्मात एक भयंकर दर्द अगदीं अडचणीच्या जागीं उद्भवल्यामुळें मला एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर देखील वळणें फार प्रयासाचें झालें, तर उठण्याची गोष्ट कशाला ! दर्दाच्या ठिकाणीं औषध-उपचार करणें देखील अशक्य; अशा स्थितींत रात्रंदिवस कळा लागून झोंप देखील लागेना. परंतु माझा विश्वास श्रीसद्गुरू साईनाथांच्या चरणीं दृढ असल्या कारणानें रात्रंदिवस माझ्या मायमाऊलीचा धांवा तोंडानें चालला होता. अशा स्थितींत प्रथमपासून १२ दिवस गेले, तरी उतार न पडल्या-कारणानें माझी नातेवाईक मंडळी मला हॉस्पिटलमध्यें योग्य उपचार करण्या-करितां नेण्याचा विचार करूं लागली. १२ वा दिवस गुरुवार, त्या दिवशीं मीं एका कुशीवर निजलों होतों आणि ज्याप्रमाणें एखाद्या लहान मुलाची आई निजली असतां तें तिला उठविण्याचा प्रयत्न करीत असतां, ती जर उठली नाहीं, तर त्याच्या मनांत जी कल्पना येते, तद्वत माझ्या मूढ मनाला वाटून मीं साधारणपणें मोठ्यानेंच बोललों कीं, "माझे आई, मी इतके दिवस तुझा धांवा करीत असतां तूं मला कशी पावत नाहींस? तूं निजली आहेस काय ? परंतु

मी टाहो फोडून तुला जागी करीन.'' इतकें बोलून डोळे उघडून सहज मागें भिंतीच्या बाजूला पाहिलें, तो माझी लहान चार वर्षांची मुलगी "इंदू" हातांत आमच्या देवाच्या चौरंगावर श्रीसाईनाथांच्या पायांपाशीं असलेला उदीचा डबा हातांत घेऊन उभी ! तावडतोब मीं तिला विचारलें कीं, "इंदू, तुला कोणी उदीचा डबा आणण्यास सांगितलें कीं काय ?'' तिनें "नाहीं" म्हणून म्हणतांच माझ्या मनाला पटलें कीं, माझी आई निजली नसून माझ्या पाठीशीं आपल्या मायेची पाखर घालण्यास उभी आहे. तावडतोब इंदूच्या हातांनीं डब्यांतील उदी कपालास लावण्यास सांगून डबा जागेवर ठेवण्यास सांगितलें, आणि तेंव्हां-पासून कळा येत होत्या, तरी ओरडण्याचें बंद केलें; कारण शरीराला होत असलेल्या यातना निमूटपणें सहन केल्या पाहिजेत; कारण त्यापासून पूर्वार्जित कोणत्या तरी गोष्टीचा झाडा होत असला पाहिजे, आणि म्हणून हे भोग भोगिलेच पाहिजेत, असा विचार मनांत आला. योग्य वेळीं दर्दाचें ऑपरेशन घरींच झालें आणि डॉक्टर व इतर मंडळी यांना वाटत होतें कीं, हें दर्द भर-ण्याला सरासरी एक अगर दीड महिना लागेल. तें दर्द आठच दिवसांत साफ बरें झालें. हा कशाचा परिणाम बरें ! तर माझी "आई'' माझ्या पाठीशीं उभी होती आणि भोक्तृत्व संपल्याबरोबर मला बरा होण्याला मुळींच वेळ लागला नाहीं. डॉक्टर, नातेवाईक व स्नेही मंडळी यांनीं तर आश्चर्यानें तोंडांत बोटच घातलें ! परंतु भक्तांचा त्राता, लेंकरांचा पाता जो श्रीसाईनाथमाऊली तिचा प्रभाव ज्याच्या मनाला पटेल त्यानेंच ओळखावा. इतरांना काय ?